# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०६.०६.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक २७.०५.२०२६ चे १७.३० वा. सुमारास, फिर्यादी आर्यन इंदल वाढवे, वय २२ वर्षे, रा. हनुमान मंदीर जवळ, मकरधोकडा, काटोल रोड नागपुर यांनी त्यांची यांनी त्यांची हिरो होन्डा स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ३१ बि.एन. ७१३८ किंमती ५०,०००/—रू. ची पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत गोरेवाडा तलावाचे बाजुला रोडवर, गोरेवाडा येथे लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी वाहन चोरून नेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून एका विधीसंघीर्षीत बालकास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षीत बालकाचे ताब्यातुन चोरी केलेले दुचाकी वाहन किंमती अंदाजे ५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. विधीसंघर्षीत बालकास मुद्देमालासह पुढील कारवाईकामी गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दिपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. अभिजीत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली, वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे ईमामवाडा :— जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०५.०६.२०२६ चे ११.४० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा नामे रितेश उर्फ दादु अश्वजीत वानखेडे, वय २२ वर्षे, रा. पाचनल चौक, रामबाग, ईमामवाडा, नागपुर हा दलीत वाचनालयाजवळ, ईमामवाडा येथे उभा असतांना, त्याचे जवळ आरोपी नामे मयंक सुरज यादव, वय २५ वर्षे, रा. रामबाग रेल्वे पटरी जवळ, ईमामवाडा, नागपुर याने येवुन त्यास दारू पाज असे म्हटले. फिर्यादीचे मुलाने त्याचेजवळ पैसे नसल्याचे सांगुन नकार दिल्याने आरोपीने त्यास शिवीगाळ करून, घरी निघुन गेला. फिर्यादीचा मुलगा व त्याचे सोबत त्याचा मित्र नामे शुभम उर्फ बिट्टु मसराम, वय १७ वर्षे, रा. रामबाग, पाचनल चौक, ईमामवाडा, नागपुर हे दोघे काही वेळाने घरी परत जात असताना, आरोपीचे घराजवळ आरोपीने घराबाहेर येवुन दोघांनाही शिवीगाळ करून, त्याचे जवळील चाकुने शुभम याचे हातावर मारले. फिर्यादीचा मुलगा वाचविण्याकरीता गेला असता, आरोपी मयंक याने फिर्यादीचे मुलास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने चाकुने मानेवर डाव्या बाजुस वार करून, गंभीर जखमी केले. वस्तीतील लोकांनी जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी अश्वजीत कृष्णाजी वानखेडे, वय ५६ वर्षे, रा. पाचनल चौक, रामबाग, ईमामवाडा, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे पोउपनि. टेमगिरे ९६८९५८४८३० यांनी आरोपीविरूध्द कलम १०९, २९६ भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, त्वरीत दखल घेवुन, आरोपीचा शोध घेवुन, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे शांतीनगर :—** आकाश जयचंद गुप्ता, वय २८ वर्षे, रा. तुळशीनगर, एनआयटी गार्डन जवळ, संजय मुदलीयार यांचे घरी किरायाने, शांतीनगर, नागपूर हे दिनांक १३.०५.२०२६ चे ०६.०० वा. पासुन पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे, डोळे—काळे, अंगात— टि—शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात. ओळख— हातावर इंग्रजीत एम एस अक्षर गोंदलेले आहे.



आकाश

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०१५३४/ २००८ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | महेंद्र भास्कर घाटोळे, रा. प्लॉट नं. ७४, पवनशक्ती नगर, चांदमारी रोड, नागपुर. | १२.०६.२०२६ |
| २ | मा. अती मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३००११४/ २०१५ | कलम १४१, १४३, १४६, १४९, ४२७, ३२४, ५०६ भा.दं.वि. | अक्षय राजु वाळुजकर, वय १८ वर्षे, रा. नंदनवन झोपडपट्टी, गल्ली नं. ०५, केडीके कॉलेज जवळ, नंदनवन, नागपुर. | १६.०६.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**